# सण साजरे करण्याच्या योग्य पद्धती आणि शास्त्र

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


१. वर्षा, शरद व हेमंत या ऋतूंत सणवार जास्त प्रमाणात असणे २५
२. सण साजरा करण्यापूर्वी करावयाची तयारी २५
३. गुढीपाडवा ( वर्ष प्रतिपदा ) २५
* गुढीपाडवा साजरा करण्याची पद्धत २८
४. अक्षय ( अक्षय्य ) तृतीया ३५
५. नागपंचमी ३८
* नागाचे माहात्म्य ३८
६. श्रावण पौर्णिमा ( नारळी पौर्णिमा ) ३९
७. नवरात्र ४१
८. दसरा ( विजयादशमी ) ४१
९. वसुबारस ( गोवत्स द्वादशी ) ४८
१०. गुरुद्वादशी ४९
११. दिवाळी ( दीपावली ) ४९
* आश्विन वद्य त्रयोदशी ५०
* नरक चतुर्दशी ५२
* आश्विन अमावास्या ५३
* लक्ष्मीपूजन ५३
* अलक्ष्मी निःसारण ५७
* बलीप्रतिपदा (दिवाळी पाडवा) ५७
* भाऊबीज (यमद्वितीया) ५९
* दीपावलीचे स्वरूप (दिव्यांची आरास, आकाशकंदील इ.) ६१
* दिवाळी साजरी करण्यासाठी फटाके वाजवू नका ! ६३
* दिवाळी हा मौजमजेचा सण नसून धार्मिकता आणि संस्कृती जपण्याचा सण ६३
* फटाके वाजवल्याने होणारे दुष्परिणाम ६४

१२. तुळशी विवाह ६५
१३. देवदिवाळी ६५
१४. मकरसंक्रांत ६६
१५. रथसप्तमी ५०

# मनोगत

**१. सण, धार्मिक उत्सव व व्रते साजरे करण्याचे उद्देश :**

अ. सर्वसाधारण माहिती : आमचे सण व उत्सव हे असे आहेत की, जे इहलोकी सुखावह होतातच, शिवाय मृत्यूनंतर सद्गती देतात.

आ. निसर्गातील बदल, उदा. नारळी पौर्णिमा. पावसाळा संपत आला की समुद्र शांत होतो, तेव्हा नारळी पौर्णिमा साजरी करतात.

इ. अवतारांच्या जन्मतिथी, उदा. श्रीराम नवमी. श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादी अवतारांच्या जन्मतिथी साजऱ्या करतात; कारण देहत्याग हा त्यांचा मृत्यू नसतो. ते भक्तांसाठी केव्हाही देह धारण करू शकतात, म्हणजेच ते अमर आहेत.

ई. संतांच्या पुण्यतिथी, उदा. श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथी. संतांच्या देहत्यागाचा दिवस साजरा करतात; कारण ते जन्माला येतात, तेव्हा बहुधा बाह्यतः केवळ सर्वसाधारण व्यक्ती किंवा साधक असतात. पुढे साधना करून ते संतपदाला पोहोचतात. देहत्यागानंतर ते उच्चलोकात जातात व त्यांचे कार्य आणखी वाढते; कारण देहासाठी आवश्यक असलेली शक्ती देह उरलेला नसल्याने कार्यासाठीच वापरली जाते. यासाठी त्यांच्या पुण्यस्मरणाचा दिवस म्हणून पुण्यतिथी साजरी करतात. सर्वसाधारण व्यक्तींच्या संदर्भात मात्र त्यांच्या मृत्यूदिनी श्राद्ध करणे आवश्यक असल्याने तो दिवस लक्षात ठेवतात.

उ. पौराणिक व ऐतिहासिक घटना, उदा. वटपौर्णिमा. या दिवशी सावित्रीने यमाला वादविवादात जिंकून पतीला पुन्हा जिवंत करून घेतले.

ऊ. आध्यात्मिक शिकवण : साधक, साधन व साध्य यांच्यात अद्वैत व्हावे, साधकाने परमेश्वराशी एकरूप व्हावे, हा साधनेचा एकमेव उद्देश असतो. त्या दृष्टीने एक टप्पा म्हणून साधनांतही ईश्वराचे रूप पहायला शिकण्याच्या दृष्टीने काही सण साजरे केले जातात, उदा.

ऊ १. शीतला सप्तमी : स्वयंपाकाच्या शेगडी, कढई, सांडशी वगैरे साधनांचा या दिवशी

वापर न करता त्यांची पूजा केली जाते.

ऊ २. पोळा : या दिवशी शेतकरी बैल व नांगर यांची पूजा करतात.

ऊ ३. विजयादशमी : प्रत्येक जण आपापल्या साधनांची पूजा करतो, उदा. शिंपी कात्री व शिलाई यंत्र यांची; विद्यार्थी व अभ्यासक त्यांच्या पुस्तकांची वगैरे.

ऊ ४. लक्ष्मीपूजन : व्यापारी लोक तराजू व हिशोबाच्या वह्या यांची पूजा करतात, तसेच गृहिणी केरसुणीची पूजा करतात.

**२. सण, धार्मिक उत्सव व व्रते यांच्यातील फरक :** हा फरक स्पष्ट असा नाही; कारण काही सण हे धार्मिक उत्सव व व्रत म्हणूनही साजरे केले जातात, उदा. श्रीराम नवमी वैयक्तिकरीत्या साजरी करतात तेव्हा 'सण' असते, समाजात एकत्रितपणे साजरी करतात तेव्हा 'उत्सव' असते व संकल्प सोडून वैयक्तिकरीत्या करतात तेव्हा 'व्रत' असते.

**३. सण, उत्सव वगैरेंकडे केवळ रूढी म्हणून पाहू नका, तर त्यांमागील गूढार्थ व शास्त्र लक्षात घ्या ! :** भारतात अनेक सण, उत्सव व परंपरा आहेत. बहुतांश जण त्यांमागील गूढार्थ व शास्त्र लक्षात न घेता त्यांकडे केवळ रूढी म्हणून पहातात व त्या दृष्टीनेच ते साजरे करतात.गुढीपाडव्याला कडुनिंबाचा प्रसाद ग्रहण करतात. 'इतर कोणत्याही पदार्थापेक्षा कडुनिंबात त्या काळात जास्त प्रमाणात येणाऱ्या प्रजापति-लहरी ग्रहण करण्याची क्षमता अधिक असल्याने, त्याचा प्रसाद ग्रहण केल्याने प्रजापति-लहरींचा लाभ अधिक होतो', हे कडुनिंब ग्रहण करण्यामागील शास्त्र आहे. सण व उत्सव यांमागील गूढार्थ व शास्त्र कळले, तर ते अधिक श्रद्धेने साजरे करता येतात; म्हणून या ग्रंथात गूढार्थ व शास्त्र देण्यावर विशेष भर दिला आहे. प्रादेशिक-भिन्नता, लोकजीवन, उपासनेच्या पद्धती इत्यादींमुळे सण, उत्सव साजरे करतांना ठिकाणानुसार चालीरीतींत काही वेळा फरक १७ आढळतो. शास्त्रीय आधार नसतांनाही केवळ पूर्वापार चालत आलेली लौकिक प्रथा म्हणून एखादी प्रथा साजरी करणे हे अयोग्य आहे. अशा लौकिक प्रथांना मूठमाती देऊन शास्त्रसंमत कृती करणेच आवश्यक असते. व्रतांच्या संदर्भात, त्यांच्यामागे एखाद्या उन्नतांचा संकल्प असतो, हेच त्यांच्यामागचे शास्त्रीय कारण होय.

**४. धर्म व संस्कृती यांची हानी करणाऱ्या प्रथांना विरोध करा ! :** अशा प्रथांनी हल्ली जनमानसात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे, उदा. दिवाळी व गणेशोत्सव यांप्रसंगी फटाके वाजवले जातात, गणेशोत्सव व नवरात्रोत्सव यांच्या निमित्ताने अनेक गैरप्रकार होतात. 'या प्रथा म्हणजेच सण किंवा उत्सव साजरा करण्याची पद्धत', असा चुकीचा संस्कार भावी पिढीवर होऊ लागला आहे. या प्रथांवर बहिष्कार टाकणे व त्यांना विरोध करणे, हे धर्मपालनच आहे. या ग्रंथांत अशा काही अनिष्ट प्रथांमधील फोलपणा दर्शवला आहे.

## ५. सण, धार्मिक उत्सव व व्रते यांचे ईश्वरप्राप्तीच्या दृष्टीने महत्त्व

अ. सण, उत्सव व व्रते यांना अध्यात्मशास्त्रीय आधार असल्याने ते साजरे करतांना त्यांतून चैतन्यनिर्मिती होते व त्यायोगे अगदी सर्वसामान्य मनुष्यालाही ईश्वराकडे जाण्यास मदत होते.

आ. साधकांच्या दृष्टीने कर्मकांड जरी कनिष्ठ दर्जाचे असले, तरी साधना न करणाऱ्यांना हळूहळू साधनेकडे वळविण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे ठरते. कर्मकांडाच्या दृष्टीने सण, धार्मिक उत्सव व व्रते इतकी महत्त्वाची आहेत की, वर्षातील जवळजवळ ७५ टक्के तिथींना यांपैकी काही ना काही असतेच.

इ. वास्तविक आपल्या जीवनात नेहमीच संयम पाहिजे; पण तो पाळला जात नाही; म्हणून निदान सण, धार्मिक उत्सव व व्रत यांच्या दिवशी तरी तो पाळला जावा, म्हणजे हळूहळू नेहमीच संयमित जीवन जगता येईल. सण, उत्सव आदींमागील शास्त्र लक्षात घेऊन ते श्रद्धापूर्वक साजरे केले जावोत व त्यायोगे जीवन कल्याणमय होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. **– संकलक**